| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा २०/२०१९**<br>**धोंडिराम रामा तोडकर वगैरे**<br>**वि.**<br>**अशोक आण्णाप्पा तोडकर वगैरे** |

## नि.११६ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १, ७ व ८ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे नि. ११८ येथे दाखल करुन सदरच्या अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर कामी वादी यांनी न्यायनिर्णय दाखल केलेनंतर त्याबाबत युक्तीवाद करणेकरिता प्रतिवादी यांना वेळोवेळी संधी देण्यात आली. मात्र प्रतिवादी क्र. १, ७ व ८ यांनी न्यायनिर्णय अनुषंगाने युक्तीवाद न सादर केल्यामुळे त्यांचा न्यायनिर्णय अनुषंगाने कोणताही युक्तीवाद नाही असे समजून अर्ज पुढे चालविण्यात आलेला आहे.

३. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी वडिलोपार्जित शेतजमीन मौजे कुशिरे तर्फे ठाणे ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे आहे. वादी चे पूर्व हक्कदार आजोबा येसबा तोडकर यांच्या एकूण ४६ गुंठे इतक्या जमिनी एकत्र कुटुंबाच्या अविभाज्य अशा होत्या. येसबा तोडकर यांना कोंडिबा, श्रीपती व रामा अशी ३ मुले होती, कोंडिबा हा सर्वात मोठा असल्यामुळे संपूर्ण जमिनीचे खाते त्याच्या नावे होते. सर्वे नं. १५०/४ चा ३९ गुंठयाचा एक स्वतंत्र भाग व सर्वे नं. १५० चा १ क्षेत्र ७ गुंठे असे दोन भाग होते. ३९ गुंठया पैकी कोंडिबाला १६ गुंठे, श्रीपतीला १५ गुंठे व त्यातील ८ गुंठे रामाला दिले व सर्वे नं. १५० (१) चे ७ गुंठे क्षेत्र रामाला दिले. परंतु त्याच प्रमाणे ७ गुंठयाचे खाते पूर्वी प्रमाणे कोंडिबाच्या नावे तसेच राहिले, कोंडिबाच्या मृत्यूपूर्वी त्याचा मुलगा अण्णाप्पा मयत झाला होता. कोंडिबाच्या वारसांनी त्याच्या हिश्याची जमीन

श्रीपतीला व कळकेला विकली, रामाच्या हिश्याची ७ गुंठे मिळकत कोंडिबा च्या मृत्यू नंतर त्याच्या वारसाच्या नावे पोकळ नोंद झाली. त्याचा गैरफायदा घेवून कोंडिबाच्या मुलीची मुले अरूण पांडुरंग जाधव याने तारीख दि. १०.०४.१९८९ ला दुसऱ्या गट नं. ७५५ चे खरेदीपत्र नोंदते वेळी वादीचे हिश्याची गट नं. ७४९ ची ७ गुंठे जमीन देखील खरेदी दस्त नं. ९० मध्ये बेकायदेशीर रित्या घुसडली. सदरची बाब २२.०१.२०१९ ला वादींना प्रतिवादी ने दावा जमिनीजवळ येवून हरकत केली त्यावेळी ते लक्षात आली व वादींनी सदरचे दस्त नं. ९० १०.०४.१९८९ चे खरेदीपत्र त्याच्या हिश्याच्या मिळकती पुरते वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही असा हुकुमनामा होवून मिळणेसाठी व कायम मनाईसाठी रे. क. नं. २०/२०१९ चा दावा दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्यात प्रतिवादी यांनी तारीख १०.०४.१९८९ चे खरेदी दस्त नं. ९० चे खरेदीपत्र कायदेशीर असल्याचा बचाव मांडला. प्रस्तुत कामी वादी यांनी सदर हजर केलेले दि. १०.०४.१९८९ च्या दस्ताच्या प्रमाणित प्रती यांना निशाणी दिल्यानंतर प्रतिवादींनी त्याबाबत हरकत घेतली. तसेच तारीख १०.०४.१९८९ च्या खरेदी दस्त नं. ९० असे नमूद करण्याचे अनावधानाने व टंकलिखित दोषाने राहून गेलेले आहे. तसेच वाद विषयाच्या न्याय निर्गतीसाठी दावा अर्जी कलम १ ब मध्ये केलेला व्यवहार त्यापुढे खरेदी दस्त नंबर ९० असे नमूद करण्यास व दावा अर्जी कलम ११ ब मध्ये दावा मिळकतीचे खरेदीपत्र दि. १०.०४.१९८९ दस्त नंबर ९० वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही असा ठराव व हुकूमनामा होवून मिळणे गरजेचे आहे. तसेच सदरची चूक ही वादीने मुद्दाम म्हणून केलेली नाही. तसेच प्रतिवादीने देखील दि. १०.०४.१९८९ रोजी दावा मिळकत गट नंबर ७४९ मध्ये आणखी दुसरा व्यवहार झाला असा बचाव मांडलेला नाही. तसेच खरेदी दस्त नंबर ९० असे नमूद करणे वादाची अंतिम सांगता होणेसाठी जरुरीचे आहे. तसे न झाल्यास दाव्याचे काम निष्फळ होईल व वादीचे कधीही व कशानेही भरून न येणारे नुकसान होईल. तसेच सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही त्यामुळे अर्जदार यांना दावा दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणे आवश्यक व गरजेचे आहे. वादी तर्फे वकील यांनी **जगनबल्क्या वि. बिद्यार्थी**

**चक्रबर्ती ए. आय. आर २००६ गुहावाटी १२०** या न्यायनिर्णयावर त्यांची भिस्त ठेवली आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी दुरुस्ती अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. १, ७ व ८ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा, चुकीचा, रचनात्मक असून तो प्रतिवादी यांना मान्य नाही. वादीचा अर्ज मुदतीत नाही. तसेच वादीने मागितलेली दावा दुरुस्तीमुळे मूळ दाव्याचे स्वरूप बदलणार आहे. सदर दावा दुरुस्ती अर्जाशी कोणताही संबंध नाही. अरुण पांडुरंग जाधव याने १०.०४.१९४९ ला करून दिलेले खरेदीपत्र पूर्णपणे कायदेशीर आहे. त्या खरेदीपत्राबाबत ३० वर्षांने वाद उपस्थित करण्याचा वादीस अधिकार नाही. दस्ताचा नंबर वादीने जाणुन बुजून नमूद केलेला नाही. वादीचा उलटतपास १०.१०.२०२३ रोजी झाला आहे तसेच वादीचा उलटतपास घेवून २ वर्षे झाली तरी त्यावेळी दुरुस्ती अर्ज का दिला नाही याचे कोणतेही योग्य संयुक्तिक कारण नमूद नाही. अंतिमतः प्रतिवादी क्र. १, ७ व ८ तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी क्र.१, ७ व ८ यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. वादी तर्फे वकील यांनी दाखल केलेल्या **जगनबल्क्या वि. बिद्यार्थी चक्रबर्ती ए. आय. आर २००६ गुहावाटी १२०** या न्यायनिर्णयामध्ये वादी याने दावा प्रतिवादी यांचे विरुद्ध त्यांचा हिस्सा हा मृत्यूपत्राद्वारे असल्याचे ठरवून मिळणेकरिता दाखल केलेला होता.

प्रस्तुत न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व सदर प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

७. कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल करण्यात आलेला आहे. तसेच वादी मागत असलेली दुरुस्ती ही स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची आहे असे वाटते. तसेच वादी मागत असलेली दुरुस्ती पाहता त्याबाबत प्रतिवादी क्र.१, ७ व ८ यांना स्पष्टीकरण देण्याचा पुर्ण अधिकार आहे असे वाटते. त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. मात्र सदरचा दावा हा आता अंतिम टप्प्यावर येवून पोहोचलेला आहे. त्यामुळे सदर कामी झालेला विलंब हा दुर्लक्ष करता येणारा नाही. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. वादी यांचा नि.११६ वरील अर्ज प्रतिवादी क्र. १, ७ व ८ यांना रक्कम रु. ७५०/– देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.**

**२. वादी यांनी दाव्यामध्ये व मनाई अर्जामध्ये दुरुस्ती १४ दिवसात करुन तात्काळ दुरुस्ती प्रत दाखल करावी.**

**सही/–**
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि.२८.०४.२०२६